प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# वनशक्तीच्या उन्हाळी शिबिरात विद्यार्थ्यांचा निसर्गाशी परिचय

## उन्हाळी शिबिरात २८ विद्यार्थ्यांचा सहभाग



**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

वनशक्ती संस्था आणि महाराष्ट्र राज्य वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उन्हाळी शिबीर २०२५ चा समारोप व प्रमाणपत्र वितरण समारंभ मानपाडा निसर्ग परिचय केंद्र, ठाणे येथे पार पडला. या सहा दिवसांच्या उन्हाळी शिबिरात ७ ते १४ वयोगटातील एकूण २८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

अधिकाधिक मुलांना पर्यावरणाशी जोडता यावे म्हणून संपूर्ण शिबीर विनामूल्य आयोजित करण्यात आले होते. शिबिरात विद्यार्थ्यांसाठी विविध निसर्गस्नेही व सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये निसर्गभ्रमंती, रोपांची लागवड व पुनर्लागवड कार्यशाळा, डिश गार्डन आणि जपानी कोकेडामा, नैसर्गिक वस्तूंपासून खेळणी बनवणे, वारली चित्रकला, यांचा समावेश होता.

निसर्गभ्रमंतीचे मार्गदर्शन वनशक्तीचे प्रकल्प व्यवस्थापक विकी पाटील, वनशक्तीच्या प्रकल्प अधिकारी चित्रा म्हस्के यांनी केले. शिबिरात विद्यार्थ्यांनी आंबा, बोर, उंबर, चाफा, काटेसावर, हिरवी सावर, खैर, बांबू, कळंब, आपटा, कांचन, बहावा, जांभूळ, आदी वृक्षांचे निरीक्षण केले. या झाडांचे पर्यावरणीय व आयुर्वेदिक महत्व आणि सांस्कृतिक कथा यांविषयी माहिती मिळवली. निसर्ग भटकंतीदरम्यान शिपाई बुलबुल, खंड्या, जांभळा यांसारखे विविध पक्षी तर बिबळ्या कडवा, हळदी-कुंकू, पिवळा शेंदुरटोक्या, पितांबरी आदी फुलपाखरांचे निरीक्षण केले.

शिबीर समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिके प्रदान केली. शिबिरादरम्यान वारली चित्रकला स्पर्धेत ऋत्वि लोलगे, स्वानंद बेलोसे, वनजा राव यांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने सन्मानित केले, तर डिश गार्डन बनवणेमध्ये विहान धनावडे, ऋग्वेद सावंत यांना पारितोषिक मिळाले.

यावेळी प्रा. अरुण इनामदार, स्टॅलिन दयानंद आणि नंदकुमार पवार उपस्थित होते.

### खेळणी बनवण्याचे मार्गदर्शन

रोपांची शास्त्रीय लागवड आणि पुनर्लागवड, डिश गार्डन, कोकेडॅमा, वारली चित्रकला, कागदी पिशव्या बनवणे, कापडी चित्रकला, आणि पर्यावरणीय खेळ यांचे मार्गदर्शन वनस्पती अभ्यासक चित्रा म्हस्के यांनी, पारंपरिक वनभोजन मार्गदर्शन फिरदोस खान, तर नैसर्गिक वस्तूंमधून खेळणी बनवण्याचे मार्गदर्शन ईशान सुर्वे यांनी केले.